## दिनांक ०७.०६.२०२४ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेचा कार्यवृत्तांत

अमरावती महानगरपालिकेची वृक्ष प्राधिकरण समितीची सभा मा.आयुक्त यांचे लगतच्या कक्षा मध्ये दिनांक ०७.०६.२०२४ रोजी स.११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सभेस खालील सन्मा. तांत्रिक सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मा.आयुक्त, महानगरपालिका, अमरावती
मा.अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका, अमरावती
मा.उपायुक्त (प्रशा) , महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी,झोन क्र.१, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी,झोन क्र.२, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी,झोन क्र.४, महानगरपालिका, अमरावती
श्री.मधुकर घारड तज्ञ, अमरावती
मा.सिस्टीम मॅनेजर, महानगरपालिका, अमरावती
उद्यान अधिक्षक, महानगरपालिका, अमरावती

**विषय क्रमांक :-** १) दिनांक १८.०४.२०२४ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेचे कार्यावृतांत समितीच्या अवलोकनार्थ
२) दिनांक १८.०४.२०२४ रोजी झालेल्या सभेचे कार्यवृतांत निर्णयाप्रमाणे कार्यपूर्ती अहवाल

### उत्तर झोन क्र.१

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | वृक्षांचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.रविंद्र काशीराव रंगारी, आनंदवाडी, कठोरा रोड, अम. | जांभुळ | ०१ | आज दि.०१/०६/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता जांभुळाचे **झाडांच्या खालच्या चारही बाजुच्या फांद्या तोडण्याची** परवानगी देण्यास हरकत नाही, सबब निर्णयार्थ सादर. | **२-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | श्री.भालचंद्र भागवत नासरे, सरस्वती कॉलनी, राठी नगर, अमरावती | सोनमोहर | ०१ | आज दि.०१/०६/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सोनमोहर **झाडाच्या इलेक्ट्रीक तारात गेलेल्या फांद्या तोडण्याची** परवानगी देण्यास हरकत नाही, सबब निर्णयार्थ सादर. | **२-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ३ | श्री.डॉ.शिरीष कृष्णराव माहोरे, स्नेह कॉलनी, अर्जुन नगर, अम. | पळस | ०१ | आज दि.०१/०६/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता पळसाचे झाड हिरवेगार असुन विठ्ठल रूखमाई मंदीराचे प्रांगणात आहे. झाड तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. एका बाजुला झुकलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. (झुकलेली बाजु) परंतु पुर्ण झाड तोडू नये असे संबंधितांना कळविण्यात यावे. सबब निर्णयार्थ सादर. | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ४ | श्री.निशिकांत गजानन रहाटगांवकर, श्रीकृष्णपेठ, अम. | चिंच-१, गोंदण-१ | ०२ | आज दि.०१/०६/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता चिंच व गोंदण झाड नाल्याच्या काठावर हिरवेगार व छान वाढलेले असुन झाड तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. परंतु पुर्ण झाड तोडू नये असे संबंधितांना कळविण्यात यावे. परंतु अर्जदार यांचा | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अर्ज दि.०५/०६/२०२४ रोजी प्राप्त झाला असुन त्यात त्यांनी फांद्या छाटण्याची परवानगी मागितली आहे. परवानगी देण्यास हरकत नसावी. सबब निर्णयार्थ सादर. | |
| ५ | श्री.किसन गंगारामजी तोमडाम, रहाटगांव, अम. | कडुलिब | ०१ | आज दि.०१/०६/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता कडुलिंब झाड पुर्ण हिरवेगार असुन रस्त्याचे कडेला आहे. झाड तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. सबब निर्णयार्थ सादर. | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ६ | श्री.गजानन अ.तुरखडे, शोभा नगर, अमरावती | रेन ट्री | ०१ | आज दि.०१/०६/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता रेन ट्री चे झाड रस्त्याच्या कडेला सार्वजनीक ठिकाणी आहे.झाडाच्या मुळा जमिनीत खोलवर गेलेल्या आहे. झाड हिरवे गार आहे.परवानगी नाकारण्यात यावी, सबब निर्णयार्थ सादर. | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ७ | श्री.विकास शेषराव तायडे, धनवंतरी कॉलनी, अमरावती | पाम वृक्ष | ०१ | आज दि.०१/०६/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता पाम वृक्ष घराच्या आवारात आहे. हिरवागार आहे. त्यामुळे झाड तोडण्याची परवानगी नाकारण्यात | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | यावी. सबब निर्णयार्थ सादर. | |
| ८ | डॉ.हेमलता सिध्दार्थ मोस्बी, सहकार नगर, अम. | महारूख | ०१ | आज दि.०१/०६/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता महारूख वृक्ष हिरवागार व सुव्यवस्थित आहे. त्यामुळे झाड तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. सबब निर्णयार्थ सादर. | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ९ | श्री.के.पी. तिवारी, सरस्वती नगर, अम. | कडूलिंब | ०१ | आज दि.०१/०६/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सदर कडुलिंबाचे झाड रस्त्याचे कडेला असुन **पुर्ण वाळलेला** आहे. त्यामुळे तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. सबब निर्णयार्थ सादर. | **नियमानुसार बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १० | प्रबंधक (का.से.) भारतीय जिवन बिमा निगम, मंडळ कार्यालय, अम. | पाम | ०१ | आज दि.०१/०६/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सदर पाम वृक्षाचे खोड आतुन खराब झालेले आहे. झाड सद्यस्थितीत हिरवेगार आहे. अपघात होवू नये म्हणून नियमानुसार अनामत रक्कम घेवून पाम वृक्ष काढण्यास परवानगी देण्यास हरकत नाही. सबब निर्णयार्थ सादर. | **नियमानुसार १:३ प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर व अनामत रक्कम घेऊन वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | सचिव, विदर्भ महारोगी सेवा मंडळ, तपोवन, अम. | सु बाभुळ- १५०, काळी बाभुळ- ०८ | १५८ | आज दि.०१/०६/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता एकुण १५० सुबाभुळ, ०८ काळी बाभुळ तोडण्याची परवानगी मागितली आहे. परंतू सदर तपोवन संस्थेने ०८ काळया बाभळीच्या फक्त फांद्या तोडण्याचे नमुद केलेले आहे. त्यामुळे १५० सुबाभुळ काढण्याला नियमानुसार अनामत रक्कम घेवून परवानगी द्यावी लागेल. परंतू तपोवन हि संस्था सामाजिक संस्था असुन त्यांचेकडून १५० X ६००० = ९,००,०००/- एवढी रक्कम जमा करण्याबाबत वृक्ष प्राधिकरणाने धोरणात्मक निर्णय घ्यावा. तसेच ०८ काळया बाभुळीच्या खालच्या बाजुच्या चारही बाजुच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हकरत नाही. सबब निर्णयार्थ सादर. | **सदर संस्थेकडून वृक्षानबाबत पूर्ण तपशील मागवून घ्यावा तदनंतर तांत्रिक सदस्य सोबत घेऊन पाहणी करून मा.आयुक्त महोदय यांच्याकडे निर्णयासाठी प्रस्तावित करावे.** |
| १२ | सौ.शोभा भगवान दास, गौतम नगर, पत्रकार कॉलनी मागे, अम. | भिंगरी | ०१ | आज दि.०१/०६/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जदाराने विना परवानगी झाड तोडल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांना विचारणा केली असता त्यांनी झाड तोडल्याचे कबुल केलेले आहे. व त्याचे फोटो सुध्दा घेण्यात आलेले आहे. त्यामुळे नियमानुसार दंड आकारणी करून वसुल करण्यात यावा. सबब | **सदर प्रकरणी ५०००/- रु.दंड आकारण्याची कार्यवाही प्रस्तावित करावी.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | निर्णयार्थ सादर. | |
| १३ | मा.उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१, अम. | कडुनिम-१७, भिंगरी-१०, | २७ | आज दि.०१/०६/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जात नमुद कडुलिंब व भिंगरी झाडे नसुन पापड प्रजातीचे ५ ते ६ वृक्ष अर्धवट स्वरूपात कापल्याचे निदर्शनास आले. तसेच काही वृक्ष JCB द्वारे काढल्याचे दिसुन आले. तसेच सदर प्रकरणाबाबत मा.आयुक्त यांचकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. तसेच तांत्रिक सदस्य यांचे अहवालामध्ये नमुद आहे. त्याअनुषंगाने विना परवानगी वृक्षतोड केल्याबाबत दि.१६/०५/२०२४ रोजी नोटीस देण्यात आली. तसेच तक्रारी बाबत सुध्दा पत्रव्यवहार करण्यात आला आहे. याबाबत संबधीत विभागाकडून खुलासा प्राप्त झाला आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **सदर बाबत सादर केल्या प्रमाणे पाहणी नुसार दोन वृक्ष पडलेली आढळून आली परंतु २५ वृक्ष तोडल्याचे निदर्शनास येत असल्याने दंड २५x२०,०००=५,००,०००/- रु. आकारण्याची कार्यवाही प्रस्तावित करावी.** |
| १४ | | कडुनिम-८ | ०८ | आज दि.०१/०६/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता एकुण ०८ कडूनिमाचे झाडांच्या फांद्या तोडण्याची परवानगी मागितलेली आहे. प्रत्यक्ष पाहणी दरम्यान असे | **अवैध वृक्षाच्या फांद्या तोडण्याबाबत ३,०००/- रु.दंड आकारण्याची कार्यवाही प्रस्तावित करावी व २-३ इंच व्यासाच्या वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, विसावा कॉलनी,अम. | | | निदर्शनास आले की, कृषी विभागाने आवार भिंतीला लागून असलेले एक कडूनिमाचे झाड ज्याचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्ष असावे. असे झाड विना परवानगी तोडलेले आहे. ते त्याच ठिकाणी अजुनही पडलेले आहे. तेथील कार्यरत कृषी सहाय्यक यांना विचारणा केली असता त्यांचे सांगितले की, या आवार भिंतीला लागुन Flat System मध्ये जे नागरीक राहतात त्यांनी झाड तोडण्यास व त्याची विल्हेवाट लावण्यास विरोध केला. याचा अर्थ तेथील जागृत नागरीकांमुळे इतर झाडांची होणारी कत्तल थांबली. विना परवानगी कडूनिमाचे मोठे हिरवेगार झाड तोडल्यामुळे संबंधीत कृषी विभागावर नियमानुसार दंड आकारणी करण्याकरीता सदर बाब वृक्ष प्राधिकरणासमोर ठेवण्यात यावी. तसेच इतर ०८ कडूनिम झाडांच्या फांद्या आवारभिंत बांधकामात येत असल्यामुळे त्यांना फक्त फांद्या तोडण्याची परवानगी देण्याकरीता विषय वृक्ष प्राधिकरणासमोर सादर करावयात यावा. सबब | **येत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | निर्णयार्थ सादर. | |

**झोन क्र.१ वेळेवरील विषय**

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | वृक्षांचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| १ | **मा.कार्यकारी अभियंता(बांधकाम) महानगरपालिका अमरावती** | **कडूनिम-२ काळ्या बाभूळ-२** | ०५ | मा.कार्यकारी अभियंता (बांधकाम) म.न.पा.अमरावती यांची प्रस्तावीत केलेल्या प्रस्तावानुसार अमरावती शहरातील चौक सौदर्याकरण सुशोभीकरण व दिद्युतीकरण रोषणाई करणे बाबत वेलकम पॉइंट चौकात २ कडुलिंबाचे झाड व २ बाभळीचे झाड (वाळलेले) वालकंपाऊट येत असल्यामुळे तसेच २ कडुलिंबाचे झाड दुस-या ठिकाणी स्थालातरीत करणे बाबत सुचविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने मा. तांत्रीक सदस्या दि.०६/०६/२०२४ रोजी पाहणी केली असता सौंदर्याकरण कंपनीचा इंजिनिअर उपस्थित नव्हते, प्रपत्र D व C भरून घेतलेले नाही. ते परिपुर्ती करून घ्यावी. काढावयाचे वृक्षाचे कलर फोटो तसेच वृक्ष इन्फ्रास्ट्रक्चर कोठे करणार याबाबत माहिती घ्यावी. सबब निर्णयार्थ सादर | **वृक्ष काढण्याची परवानगी मंजूर करण्यात येत असून त्या बदल्यात उद्यान विभागाने १५ वृक्ष लावण्याची कार्यवाही करावी.** |

झोन क्र. २

| अ.क्रं. | अर्जदाराचे नाव | वृक्षाचे वर्णन | वृक्ष संख्या | वृक्ष अधिकारी व तांत्रीक सल्लागार यांचा अहवाल | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| १ | **शालीनी ठेंगरे बेलपुरा, सावरकर किराणा समोर अमरावती** | **करंज वृक्ष फांदया १** | १ | दिनांक २१/०५/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. करंज वृक्ष रस्त्याच्या कडेला मनपा व्दारा लावलेला छान वाढलेला व हिरवागार आहे. वृक्षाच्या बुडापर्यंत स्टाईल्स व क्रॉक्रीट केल्याने वृक्षाला अडचण निर्माण झाली आहे. क्रॉक्रीट व ब्लॉक हटविण्यात यावे असे आदेशित करावे. तसेच अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या ३-४ इंच व्यासाच्या फांदया काढण्याची परवानगी उद्यान विभाग यांना देण्यात आली. शक्तीमान यंत्राव्दारे उद्यान विभागाने कार्यवाही करुन फांदया काढाव्यात फांदया काढतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.<br>वृक्षाच्या फांदया काढण्याकरीता परवानगी पत्र उद्यान विभागात पाठविले आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.<br>जा.क्रं. १३१ दि. २४/०५/२०२४ | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.** |
| २ | **संध्या एम लोखंडे परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालय सामान्य रुग्णालय अम. (नर्सेस होस्टेल)** | **आंबा-१, बदाम-१, सोनमोहर-१ वृक्षाच्या फांदया** | ३ | दिनांक २१/०५/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. शासकिय परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालय परिसरात नर्सेस होस्टेल आंबा, बदाम, सोनमोहर इत्यादी विविध प्रकारची वृक्ष छान वाढलेली व हिरवीगार आहेत. त्यापैकी इमारतीच्या मागील बाजुस असलेला आंबा वृक्ष इमारतीवर रेस्ट (पहुडला) झाला आहे. आंबा वृक्षाच्या १ फांदया (भिंतीला स्पर्श करणारा) काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. तसेच बदाम व सोनमोहर वृक्षाच्या १-२ इंच व्यासाच्या जमीनीकडील भागाच्या बारीक फांदया काढण्यास हरकत नाही. देखभाली अभावी परिसर परिसरात घाण व झुडपे गवत वाढलेले आहे. इमारतीच्या छतावर देखील नैसर्गिक रित्या | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | बी पडल्याने वृक्षाची रोपटे निघालेली आहे. याबाबत होस्टेल अधिक्षका यांना सुचना देण्यात आल्या चर्चा केली. अर्जदारास वृक्षाच्या फांदया काढण्याची परवानगी देण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.<br>जा.क्रं. १३८ दि. २७ /०५/२०२४ | |
| ३ | **श्री शामराव गंगारामजी चौधरी दरोगा प्लॉट अमरावती.** | **औदुंबर वृक्ष फांदया १** | १ | दिनांक २१/०५/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. दरोगा प्लॉट परिसरातील घोषित झोपडपट्टी असल्याचे सांगण्यात आले. औदुंबर वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे. वृक्ष अर्जदाराचे घराचे अंगणात रस्त्यालगत आहे. वृक्षाच्या अर्जदाराचे घरावर गेलेल्या ३-४ इंच व्यासा पर्यतच्या फांदया काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. फांदया काढतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी असे सुचित करण्यात यावे. अर्जदारास वृक्षाच्या फांदया काढण्याची परवानगी देण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.<br>जा.क्रं. १३७ दि. २७ /०५/२०२४ | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.** |
| ४ | **मा. मुख्याध्यापीका आदर्श प्राथमिक शाळा खापर्डे बगीचा अमरावती** | **१ कडुनिंब वाळलेला वृक्ष भिंगरी वृक्ष फांदया-१** | २ | दिनांक २१/०५/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. आदर्श प्राथमिक शाळेच्या परिसरात १ वाळलेला कडुनिंब वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. नियमानुसार त्याच प्रजातीची ३ कडुनिंब वृक्ष लावण्याची सुचित करण्यात यावे. तसेच इमारतीचे मागील भागात असलेल्या भिंगरी वृक्षाच्या शाळा इमारतीवर झुकलेल्या २-४ इंच व्यासाच्या फांदया काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.<br>अर्जदारास १ वाळलेला कडुनिंब व १ भिंगरी वृक्षाच्या फांदया काढण्याची परवानगी देण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.<br>जा.क्रं. १३९ दि. २७ /०५/२०२४ | **एक वाळलेला कडुनिंब वृक्ष व भिगरी वृक्षाचा फांद्या कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.** |
| ५ | **राजेंद्र माधवराव आगरकर श्याम नगर अमरावती.** | **१ सुबाभुळ वाळलेला वृक्ष गुलमोहर वृक्ष फांदया-२** | ३ | दिनांक २१/०५/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. नित्यानंद सोसायटी इमारत म्हाडा शाम नगर परिसरात आहे. इमारतीस अर्जदाराचे लगत असलेला १ वाळलेला सुबाभुळ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. नियमानुसार त्याबदली ३ वृक्ष सोसायटी | **एक वाळलेला सुबाभुळ वृक्ष व गुलमोहर वृक्षाचा फांद्या कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | परिसरात लावण्याचे आदेशित करण्यात यावे. तसेच सोसायटीचे प्रांगणात असलेल्या २ गुलमोहर वृक्षाच्या जमीनीकडे लोंबकणा-या १-२ इंच व्यासाच्या फांदया काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. फांदया काढतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी असे सुचित करण्यात यावे. अर्जदारास १ वाळलेला सुबाभुळ व २ गुलमोहर वृक्षाच्या फांदया काढण्याची परवानगी देण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.<br>जा.क्रं. १३५ दि. २७/०५/२०२४ | |
| ६ | **श्रीमती प्रभा पाठक खापर्डे बगीचा अमरावती.** | **१ सरु वाळलेला वृक्ष आडजात वृक्ष १** | २ | दिनांक २१/०५/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अर्जदाराचे घराजवळील रस्त्याचे कडेला वाढलेली ट्रीगार्ड मध्ये असलेल्या १ वाळलेला सरु वृक्ष व रस्त्याकडे झुकलेला आडजात १ वृक्ष काढण्याची नियमानुसार उद्यान विभागाने कारवाई करावी. व बदली वृक्ष लावण्यासाठी प्रपत्रात नोंद घ्यावी. व ट्रीगार्ड मधील इंग्रजी चिंच राखण्यात यावा.<br>१ सरु वाळलेला वृक्ष, आडजात वृक्ष १ काढण्याकरीता परवानगी पत्र उद्यान विभागात पाठविले आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.<br>जा.क्रं. १३६ दि. २४/०५/२०२४ | **एक वळलेला सरू वृक्ष व झुकलेला आडजात वृक्ष काढण्याची कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.** |
| ७ | **श्री मंगेश वसंतराव अजमीरे मांगीलाल प्लॉट कॅम्प अम.** | **कडुनिंब-१ बदाम-१ सागवान-३ घोसा-१ चाफा-१ वृक्ष** | ७ | ससनर विभागाने दिलेल्या अहवाल नुसार बांधकामात येणारी वृक्ष काढण्याची ठेव स्वीकारुन पर्यायी वृक्ष लागवड करीता परवानगी देण्यास हरकत नाही.<br>मा. तांत्रीक सदस्य यांचा अहवाल प्राप्त अहवालानुसार बांधकामात येणारी कडुनिंब-१,बदाम-१,सागवान-३,घोसा-१, चाफा-१एकुण ७ वृक्ष काढण्याच्या बदलीत बदली वृक्ष लावण्याकरीता नियमानुसार ठेव रक्कम जमा करणेकरीता फर्मविण्यात यावे लागेल. १x३ असे ४ x३=१२, १२x२०००=२४००० रुपये (चौवीस हजार रुपये) सागवान १x१ असे ३x२०००= ६००० रुपये (सहा हजार रुपये) एकुण रक्कम २४०००+६०००=३०००० रुपये (तीस हजार रुपये) ठेव रक्कम जमा केल्यानंतर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.<br>७ वृक्ष काढण्याकरीता दि. ०६/०५/२०२४ रोजी | **नियमानुसार १:३ प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | मा. आयुक्त यांची मान्यता घेवुन नियमानुसार वृक्ष तोडण्याच्या बदली बदली वृक्ष लावण्याकरीता ठेव रक्कम जमा करण्याकरीता नोटीस देण्यात आली. नोटीसनुसार अनामत ठेव ३००००/- रुपये (तीस हजार रुपये) बुक नं. २५४७ पावती क्रं. ०३ दि.०७/०५/२०२४ रोजी उद्यान विभाग येथे भरणा करुन पावतीची छायाकित प्रत सादर करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने कडुनिंब-१,बदाम-१,घोसा-१,चाफा-१, सागवान-३ एकुण ७ वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे.<br>कार्योत्तर मंजुरीस सादर.<br>जा.क्रं. ७८ दि. ०७/०५/२०२४ | |
| ८ | **श्री सुबोध मोरेश्वर सहस्त्रबुध्दे जनार्दन पेठ अमरावती** | **गुलमोहर वृक्ष -१ फांदया** | १ | दिनांक ३१/०५/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. गुलमोहर वृक्ष रस्त्याचे कडेला छान वाढलेला व हिरवागार आहे. पुर्वे कडील भागात झुकलेला १ फांदा काढण्याची (६० से.मी पेक्षा जास्त) परवानगी देण्यास हरकत नाही. उद्यान विभागाने वृक्षाचा तोल बिघडणार नाही या पदधतीने फांदया काढण्याची कार्यवाही त्वरीत करावी. उचित निणर्यास सादर. | **गुलमोहर वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या फांदया काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ९ | **श्री नलीन विनोदराव पडिया अंबापेठ अमरावती** | **गुलमोहर वृक्ष -१ फांदया** | १ | दिनांक ३१/०५/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. गुलमोहर वृक्ष सार्वजनीक जागेवर रस्त्याचे कडेला छान वाढलेला व हिरवागार आहे. वृक्षाचा पश्चिमेकडे झुकलेला मोठा फांदा काढुन (६० से.मी पेक्षा जास्त जाडीचा) झाडाचे संतुलन करावे. फांदया काढतांना विद्युत विभागाशी संपर्क करावा. जेणेकरुन विज प्रवाह खंडीत करता येईल. उचित निणर्यास सादर. | **गुलमोहर वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या फांदया काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १० | **सौ. प्रिती राहुल कुलकर्णी अंबोपठ अमरावती. आयकर भवन जवळ** | **काशीद वृक्ष फांदया** | | दिनांक ३१/०५/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. काशीद वृक्ष सार्वजनीक जागेवर रस्त्याचे कडेला छान वाढलेला व हिरवागार आहे. रस्त्याकडील भागात झुकलेल्या २-३ इंच व्यासाच्या उद्यान विभागाने शक्तीमान यंत्राव्दारा काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निणर्यास सादर. | **काशीद वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या फांदया काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ११ | **श्रीमती मालती** | **चाफा-१ अशोका-२** | ४ | दिनांक ३१/०५/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मधुसुदन मोकदम गांधी नगर गुरुव्दारा जवळ अम. | कडु बदाम-१ फांदया | | अहवाल प्राप्त झाला. अर्जदाराचे स्वतःचे घराचे आवारात असलेली चाफा १, अशोका २, वृक्षाच्या फांदया २-४ इंच व्यासाच्या फांदया काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. तसेच सार्वजनीक रस्त्यावर कडेला वाढलेला करंज वृक्षाच्या फांदया उद्यान विभागाने शक्तीमान यंत्राव्दारा काढण्याची कार्यवाही करावी. उचित निणर्यास सादर. | |
| १२ | श्री. शैलेश वि. शहा बडनेरा रोड डॉ. उमाळे च्या बाजुला | आंबा-१ जांभुळ -१ फांदया | २ | दिनांक ३१/०५/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अर्जदाराचे स्वताःचे राहत्या प्लॅटमध्ये आंबा वृक्ष व जांभुळ वृक्ष छान वाढलेला व हिरवीगार व फळे येणारी आहेत. अर्जदाराला आंबा वृक्षाच्या उत्तरेकडे झुकलेल्या २ फांदया ६० से.मी वरील तसेच जांभुळ वृक्षाच्या शेजारी राहणारे डॉ. उमाळे यांचे घरावर झुकलेल्या ४-५ से.मी. जाडीच्या २-३ फांदया काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निणर्यास सादर. | **वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या फांदया काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १३ | श्री अरुण नथ्थुलाल गुप्ता अंबापेठ अमरावती. डॉ. अडवानी समोर , डॉ. बाहेती मागे | कडुर्निंब वृक्ष वाळलेले | १ | दिनांक ३१/०५/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. कडुनिंब वृक्ष सार्वजनीक जागेवरील वाळलेला आहे. उद्यान विभागाने वृक्ष काढण्याची व बदली वृक्ष लावण्याची नियमानुसार कार्यवाही करावी. उचित निणर्यास सादर. | **वृक्ष काढण्याची उद्यान विभागा मार्फत करावी.** |
| १४ | श्री विजय उदारामजी दातेराव श्री सतिश उदारामजी दातेराव फर्शी स्टॉप अमरावती | कडुनिंब,कडुब दाम-१, उंबर,वड, गुलमोहर वृक्ष | | दिनांक ३१/०५/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अर्जदाराच्या रिकाम्या प्लॉटमध्ये कडुनिंब ५, वड १, उबंर १, काशीद २, करंज २ अशी एकुण ११ वृक्ष छान वाळलेली साधारणपणे २० ते ३०वर्ष वयाची असुन रस्त्याकडील प्लॉटच्या कडेला आहे. अर्जदाराला गॅस पंप (LPG) लावायचा असल्याचे सांगण्यात आले तथापी शासनाचे परवानगी पत्र जोडलेले नाही. किंवा कोणत्याही कंपनीचे मंजुरीचे पत्र दिसुन येत नाही. तथापी ससनर विभागाने बांधकामाची मंजुरी दिली असुन उपरोक्त वृक्ष प्रत्यक्ष बांधकामात येतात किंवा कसे याबाबत स्पष्ट उल्लेख नियमानुसार (नकाशात तथा | **बांधकामात येणारी वृक्ष तोडण्याची परवानगी मंजूर करण्यात येत असून नियमानुसार १:३ प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर अनामत रक्कम स्विकारून परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | पत्रात) केलेला दिसुन येत नाही. सबब ससनर विभागाने बांधकामात वृक्ष येतात या बाबत किंवा गॅस पंप बांधकामा करीता वृक्ष काढावे लागतात किंवा कसे या बाबत स्पष्टता करावी. तसे पत्र ससनर विभागात देण्यात यावे त्यानंतर वृक्ष काढण्याबाबत विचार करणे सोईचे होईल. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. वृक्षाला इजा पोचवु नये असे अर्जदाराला सुचित करण्यात यावे. उचित निणर्यास सादर. | |
| १५ | **श्री ईशांत कोचर गणेश कॉलनी अमरावती** | **कडुबदाम-१ अवैध वृक्ष तोड** | | मा. सहा. आयुक्त झोन क्रं. २ यांनी दिलेल्या सुचनेनुसार दि. २९/०४/२०२४ स्वास्थ निरीक्षक यांच्या प्राप्त अहवालानुसार प्रभाग क्रं. १३ अंबापेठ गौरक्षण अंतर्गत गणेश कॉलनी येथील इमारतीचे बांधकाम सुरु असुन इमारती समोरील सार्वजनीक रस्त्यावरील छान हिरवेगार १ कडुनिंबाचे वृक्ष अर्धवट कापुन नष्ट केले व संपुर्ण वृक्ष नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे असे निदर्शनास आले आहे. विना परवानगी वृक्ष तोडल्या प्रकरणी लेखी स्पष्टीकरण सादर करणे बाबत नोटीस देण्यात आली आहे. व स्मरण नोटीस देण्यात आली आहे. विहित कालावधी मध्ये खुलासा प्राप्त झालेला नाही. उचित निणर्यास सादर.<br>जा. क्रं. ५९ दि. ०३/०५/२०२४ | **नियामाप्रमाणे २०,०००/- रु.दंड आकारण्याची कार्यवाही प्रस्तावित करावी.** |
| १६ | **मा. अध्यक्ष गौरक्षण संस्था दस्तुर नगर चौक अम.** | **सुबाभुळ-१ अवैध वृक्ष तोड** | १ | श्री मुन्ना राठोड रा. शंकर नगर राजापेठ अमरावती यांनी दिनांक १३/०५/२०२४ रोजी दिलेल्या भ्रमणध्वनी व्दारे तक्रार वृक्ष अधिकारी यांना प्राप्त दिनांक १४/०५/२०२४ रोजी प्राप्त तक्रार नुसार वृक्ष अधिकारी यांनी स्थळ निरीक्षण केले असता प्रभाग क्रं. १८ गौरक्षण संस्था दस्तुर नगर चौक अम. येथील शेताला असलेले तार कम्पाऊंड ला लागुन असलेला १ सुबाभुळ वृक्ष अर्धवट कापुन नष्ट केले व संपुर्ण वृक्ष नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे असे निदर्शनास आले आहे. विना परवानगी वृक्ष तोडल्या प्रकरणी लेखी स्पष्टीकरण सादर करणे बाबत जा.क्रं.१०२ दि. २०/०५/२०२४ रोजी नोटीस देण्यात आली आहे. त्यानुसार दि. २७/०५/२०२४ रोजी लेखी खुलासा या कार्यालयास प्राप्त् झाला आहे. खुलासा मध्ये संस्थेमध्ये पोलीस प्रशासनाव्दारे व मनपा व्दारे | **खुलासा मान्य करून प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | पकडलेल्या गोवंशाचे संरक्षण व संगोपन केल्या जाते. संस्थेच्या शेताच्या तार कम्पाऊंड ला लागुन असलेल्या सुबाभुळचे झाड व अन्य कोणतेही झाड संस्थेव्दारे कापुन नष्ट करण्याचा प्रयत्न संस्थेकडुन मुळीच करण्यात आलेला नाही. कारण तार कम्पाऊंड ला लागुन अनेक वृक्ष आहेत.<br>असे लेखी स्प्ष्टीकरण प्राप्त झालेले आहे.<br>उचित निणर्यास सादर. | |
| १७ | **श्री नरेंद्रजी केडीया केडीया मॉल श्रीकृष्ण पेठ अमरावती.** | **आडजात अवैध वृक्ष तोड** | १ | मा. सहा. आयुक्त झोन क्रं. २ यांनी दिलेल्या सुचनेनुसार दि. २८/०५/२०२४ स्वास्थ निरीक्षक यांच्या प्राप्त अहवालानुसार प्रभाग क्रं. ०७ जवाहर स्टेडियम अंतर्गत श्रीकृष्ण पेठ येथील केडीया मॉल समोरील सार्वजनीक रस्त्यावरील छान हिरवेगार १ आडजात वृक्षाच्या फांदया व वृक्ष अर्धवट कापुन नष्ट केले व संपुर्ण वृक्ष नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे असे निदर्शनास आले आहे. विना परवानगी वृक्ष तोडल्या प्रकरणी लेखी स्पष्टीकरण सादर करणे बाबत जा. क्रं. १४६ दि. २८/०५/२०२४ रोजी नोटीस देण्यात आली आहे. त्यानुसार गैरअर्जदार यांनी दि. ०३/०६/२०२४ रोजी कार्यालयास लेखी खुलासा सादर करण्यात आला. वृक्षाच्या फांदया आमच्या वरच्या फ्लोअर मधुन आतमध्ये येत होत्या तसेच एकदम वरच्या फांदया ब-याच वाढल्यामुळे त्यावर अनेक पक्षी व कबुतराची विष्ठा कस्टमरच्या अंगावर पडत होत्या व १-२ वेळा ग्राहकांना नाहक त्रास झाला होता. तसेच येथेच मधुमाश्यांच्या पोळे सुदधा वारंवार होत होते. त्यामुळे झाडाच्या वरच्या फांदयाची छटाई केली आहे. फांदया तोडलेल्या नाही व झाडाच्या खालच्या भागाला तर थोडासाही धक्का लागलेला नाही. आम्हाला हे झाड वर्षोनुवर्षे जिवंत ठेवायचे आहे. असा अहवाल प्राप्त् झाला आहे. उचित निणर्यास सादर. | **खुलासा मान्य करून प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.** |
| १८ | **श्री दिपक ठाकरे (अध्यक्ष) शितलसिंह चव्हान** | **उंबर, पिपंळ, आवळा, वड, कडुनिंब, आडजात-२ अवैध वृक्ष** | ७ | विना परवानगी वृक्ष तोड केल्या प्रकरणी श्री प्रमोद तु. सोनकुसरे व इतर दि. १०/१०/२२ रोजीचे प्राप्त तक्रार नुसार वृक्ष प्राधिकरण सभा दि. २७/०९/२३ ठराव क्रं. १० नुसार ठेव रक्कम माफ करुन वृक्ष लावण्यास सुचविले आहे. व | **दंड कायम ठेवण्याची कार्यवाही प्रस्तावित करावी.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **(सचिव) बालाजी नगर विकास समिती शंकर नगर जवळ अमरावती.** | **तोड** | | दंडाची रक्कम २५०००/- रुपये भरण्याकरीता नोटीस देण्यात आली आहे. त्यानुसार गैरअर्जदार यांनी दि. १९/०१/२०२४ रोजी विनंती अर्ज सादर केलेला आहे. परिसरात वृक्ष लावलेले आहे व आता सर्व झाडे हिरवीगार झालेली आहे. त्यांचे सोबत फोटो जोडलेले आहे व मनपाने आकारलेला दंड रद्द करण्यात यावा. अशी विनंती केलेली आहे. सदर प्रकरण वृक्ष प्राधिकरण सभा दि. ०७/०२/२४ रोजी ठराव क्रं. २१ नुसार जा. क्रं. ८०६ दि. ०१/०३/२४ रोजी दंड रक्कम उद्यान विभाग मनपा येथे भरणा करण्याकरीता नोटीस देण्यात आली आहे. सदर गैरअर्जदार यांनी दि. १८/०३/२४ रोजी अर्ज सादर करुन महानगरपालिकेने या संदर्भात केलेली कार्यवाही रद्द करण्यात यावी तसेच आकारण्यात आलेला दंड रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे. सदर अर्जावर मा. आयुक्त यांनी प्रकरण समिती समोर सादर करावे असे सुचित केले आहे. उचित निणर्यास सादर. | |

**झोन क्र.३**

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | वृक्षांचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| १ | संचालिका- दिव्य सदन सोशल सेंटर, वडाळी | काशिद<br>चेंडुफळ | ०२<br>०१ | दि. ३०/०५/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली, २ काशिद व १ चेंडुफळ एकुण ३ वृक्षांच्या मागील घराकडे झुकलेल्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **२-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| २ | श्री.एस.पी. ठाकुर,<br>रा. चपराशीपुरा | कडुनिंब<br>बेल<br>अशोका | ०१<br>०१<br>०१ | दि. ३०/०५/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली, १ बेल, १ अशोका व १ कडुनिंब वृक्षांच्या विद्युत ताराकडे गेलेल्या फांद्या उद्यान विभागा मार्फत काढाव्या लागतील. उचित निर्णयास्तव सादर. | **२-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची कार्यवाही उद्यान विभागामार्फत करावी.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | श्री. प्रशांत बाबाराव कडु<br>रा. काँग्रेस नगर, अमरावती. | अशोका<br>निलगीरी | ०२<br>०१ | दि. ३०/०५/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली १ निलगीरी व २ अशोका वृक्षांच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **२-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ४ | श्री. देवमन ढोके,<br>रा. कैलास नगर,अमरावती | अशोका | ०२ | दि. ३०/०५/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली, २ अशोका वृक्षांच्या विद्युत तारावर गेलेल्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **विद्युत तारेवर गेलेल्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ५ | श्री. विजय केशवराव सुने,<br>रा. पोस्टमन कॉलनी, अमरावती. | रेन ट्री | ०२ | दि. ३०/०५/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली, २ रेन ट्री वृक्षाच्या विद्युत तारावर गेलेल्या फांद्या तोडण्याची कार्यवाही उद्यान विभागा मार्फत करावी लागेल. उचित निर्णयास्तव सादर. | **विद्युत तारेवर गेलेल्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची कार्यवाही उद्यान विभागामार्फत करावी.** |
| ६ | श्री. रोशन कडु<br>रा. गणेश नगर, अमरावती | कडुनिंब | ०१ | दि. ३०/०५/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली, १ कडुनिंब वृक्षाच्या विद्युत तारावर गेलेल्या फांद्या तोडण्याची कार्यवाही उद्यान विभागा मार्फत करावी लागेल. उचित निर्णयास्तव सादर. | **विद्युत तारेवर गेलेल्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची कार्यवाही उद्यान विभागामार्फत करावी.** |
| ७ | श्री. किरण सवई<br>रा. चवरे नगर, अमरावती. | कडुनिंब | ०१ | दि. ३०/०५/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली, १ कडुनिंब वृक्ष हिरवागार आहे झाडाच्या आजुबाजुला घरे आहे. वृक्षाचा समतोल कायम ठेवुन वृक्षाच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **२-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ८ | श्री. पंकज मदरे | पींपळ | ०१ | दि.२९/०४/२०२४ रोजी सार्वजनिक जागेवर असलेल्या १ पिंपळ वृक्षाच्या | **सदर बाबत २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | रा. फ्रेजरपुरा, अमरावती. | | | अस्त व्यस्त वाढलेल्या फांद्या तोडण्याबाबत उद्यान विभागाला परवानगी पत्र देण्यात आली आहे. कृपया कर्योत्तर मंजुरात देण्यात यावी. | **कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.** |
| ९ | श्री. मिलींद आकोडे रा. महादेव खोरी, अमरावती. | कडुनिंब | ०१ | दि.२९/०४/२०२४ जा.क्र. ४१/२४ नुसार रोजी सार्वजनिक बगीच्या मधील वादळाने पडलेल्या १ कडुनिंब वृक्षाची विल्हेवाट लावण्याची उद्यान विभागाला पत्र देण्यात आले आहे. कृपया कर्योत्तर मंजुरात देण्यात यावी. | **वादळाने पडलेल्या कडुनिंब वृक्षाची विल्हेवाट लावण्याची कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.** |
| १० | श्री. सुभाष बनसोड, रा.दस्तुर नगर, अमरावती. | काशिद | ०१ | दि. ३०/०५/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली, काशिद वृक्ष हिरवागार व मुख्य रस्त्याच्या कडेला आहे. वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर. | **वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ११ | श्रीमती माधुरी गजानन किन्हेकर, रा. मेहेरबाबा कॉलनी, अमरावती. | आकाशनिम | ०१ | दि. ३०/०५/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली, १ आकाशनिम वृक्षाच्या विद्युत तारावर गेलेल्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **विद्युत तारेवर गेलेल्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १२ | श्री. आवेश नागपुरे रा. प्रशांत नगर, अमरावती. | सुबाभुळ | ०३ | | |
| १३ | श्री. उदय काटपातळ रा. भगवान नगर, अमरावती. | सप्तपर्णी | ०१ | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | मा. तांत्रीक सदस्य यांच्या पाहणी करीता वाहन उपलब्ध नसल्याने अ.क्र. १२ ते १७ (एकुण ६) प्रकरणाची पाहणी होवु शकली नाही. प्रकरणाची पाहणी करुन पुढील सभेत अहवाल सादर करण्यात येईल. | **पाहणी करून मा.आयुक्त महोदय यांची परवानगी करीता समक्ष सादर करावे.** |
| १४ | श्री. चेतन वानखडे रा. प्रशांत नगर, अमरावती. | वड | ०१ | | |
| १५ | श्री. पुरूषोत्तम मोहोड रा. दिप नगर, अमरावती. | आंबा | ०१ | | |
| १६ | श्री. माधव सरदार रा. दसरा मैदान समोर, अमरावती. | उंबर | ०१ | | |
| १७ | श्री. अविनाश भालचक्र रा. किशोर नगर, अमरावती. | कडुनिंब<br>जांभुळ<br>गुलमोहर | ०१<br>०१<br>०१ | | |

**झोन क्र. ४**

| अ. क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | वृक्षांचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| १ | अर्जदार - श्री साईबाबा विद्यालय साईनगर, अमरावती | कडुनिंब | २ | • दिनांक ०४.०६.२०२४ रोजी मा. तांत्रिय सदस्य यांचेमार्फत प्रत्यक्ष स्थळं निरिक्षण केले असता अर्जदाराचे शाळां परिसरात कडुनिंब वृक्ष छांन वाढलेले हिरवेगार आहे. नळांजवळंील कडुनिंब वृक्ष | **सदर बाबत १ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | कॉंक्रिटमध्ये फसल्याने व वाकल्यामुळें वादळांत पडण्याची शक्यता लक्षात घेवुन वृक्ष काढण्याची परवानगी नियमानुसार देण्यास हरकत नाही. पर्यायी वृक्ष लागवडीसाठी ठेव स्विकारल्यानंतर परवानगी देण्यास हरकत नाही.<br>सदर अहवालानुसार १ वृक्ष काढण्याच्या मंजुरीकरीता सविनय सादर | |
| २ | श्री मधुकर साहेबराव पंधे, साई नगर, अमरावती | कडुनिंब | १ | • दिनांक ०४.०६.२०२४ रोजी मा. तांत्रिय सदस्य यांचेमार्फत प्रत्यक्ष स्थळं निरिक्षण केले असता वृक्ष अर्जदाराच्या घराच्या मागील बाजुस रिकाम्या प्लॉटच्या सर्व्हीस लाईनमध्ये आहे. कडुनिंब वृक्ष छांन वाढलेला व हिरवागार आहे. अर्जदाराच्या घरावर झुकलेल्या २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या अर्जदारास काढण्यास परवानगी देण्यास हरकत नाही. फांद्या काढतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्याच्या सुचना द्याव्यात.<br>अहवालानुसार वृक्षाच्या फांदया काढण्याच्या मंजुरीकरीता सविनय सादर. | **आवश्यक फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

आयुक्त
महानगरपालिका,**अमरावती**